साप्ताहिक
# दर्शक

E-mail : weeklydarshak.gmail.com R.N.I.NO.MAH/MAR/2000/02266

वर्ष ३५ अंक ४९ सोमवार २० जुलै ते रविवार २६ जुलै २०२० किंमत रु.२

## कोरोनावरील उपचाराबाबत विविध पॅथींच्या तज्ज्ञांशी मुख्यमंत्र्यांची चर्चा

मुंबई, दि.२२ : कोरोनाच्या रुग्णांवर उपचारासाठी होमिओपॅथी,आयुर्वेद, युनानी या क्षेत्रातील तज्ज्ञांनी मार्गदर्शक सूचना तयार करुन टास्क फोर्सकडे द्याव्यात जेणेकरून एकात्मिक औषधोपचार देऊन रुग्णांना बरे करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितले.मुख्यमंत्र्यांनी काल राज्यातील विविध पॅथींचे तज्ज्ञ व वैद्यकीय व्यावसायिकांच्या संघटनांच्या प्रतिनिधींशी चर्चा केली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ.प्रदीप व्यास, आयुष उपचारासाठीच्या समितीचे अध्यक्ष डॉ. तात्याराव लहाने, मुंबईच्या माजी महापौर डॉ. शुभा राऊळ, निमा, आय एम ए, आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी वैद्यकीय व्यावसायिकांच्या संघटनेचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.मुख्यमंत्री म्हणाले, राज्य शासनाने नेमलेल्या टास्क फोर्सच्या मार्गदर्शक सूचनेनुसार कोरोनाच्या रुग्णांवर उपचार केले जात आहेत. आयुषच्या माध्यमातून प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठी देखील राज्य शासनाने समिती नेमली आहे. उपचारांमध्ये सर्व पॅथी महत्त्वाच्या असून त्यातील औषधांसाठी सर्वांनी मिळून राज्य शासनाला दोन पानी मार्गदर्शक सूचना तयार करून देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.आयुष मधील औषधांची प्रतिबंधात्मक आणि उपचारासाठी अशा दोन भागात विभागणी करून तज्ज्ञांनी त्या संबंधी उहापोह करावा आणि टास्क फोर्सकडे सर्वसमावेशक सूचना सादर कराव्यात जेणे करून त्या कोरोना रुग्णांच्या उपचारात उपयुक्त ठरतील, असेही त्यांनी सांगितले. या संकट काळात आर्युवेद, युनानी यांचे महत्त्व जगाला पटवून देण्याची संधी असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

# जामखेडमध्ये दूध दरवाढीसाठी रस्त्यावर ओतले दूध

# भाववाढीसाठी आंदोलन करा दूध सांडणे थांबवा !

जामखेड, दि. २१ –संपूर्ण महाराष्ट्रात स्वाभिमानी संघटनेने दूध उत्पादक शेतकऱ्यांना दरवाढीसाठी आंदोलन पुकारण्याचे आवाहन केले आणि संपूर्ण राज्य दूध रस्त्यावर सांडण्यासाठी सज्ज झाला आणि अक्षरशः हजारो,लाखो लीटर दूध रस्त्यावर फेकून देण्यात यांना यश आले परंतू आपल्या या दरवाढीच्या मागणीत दूधाला रस्त्यावर सांडण्यापेक्षा गोरगरीबांच्या पोटात जाईल अशी कृपया व्यवस्था करावी आणि पाहिजे तोपर्यंत आपले आंदोलन सुरु ठेवावे कमीत कमी रस्त्यावर दूध फेकून देण्यापेक्षा गरीबाच्या पोटाची भूक क्षमेल याकडे दूध उत्पादकांनी लक्ष द्यावे एवढीच जन सामान्यांची अपेक्षा आहे. गायीच्या दूध दरात १० रुपयांनी वाढ करावी, या प्रमुख मागणीसाठी स्वाभिमानी



शेतकरी संघटनेने आंदोलन सुरू केले आहे. तालुक्यातील विविध गावांतही ग्रामदैवताला दुधाचा अभिषेक घालून दूध आंदोलन सुरू करण्यात आले. शहरातही संघटेनच्या पदाधिकाऱ्यांनी नगर–बीड महामार्गावर दूध ओतून दूध दर वाढीची मागणी केली. यावेळी १० हजार टन दूध पावडर आयात करण्याचा निर्णय त्वरित रद्द करावा, ३० हजार टन दूध पावडरचा बफर स्टॉक करून निर्यात अनुदान प्रतिकिलो ३० रुपये देण्यात यावे, दूध पावडर,तूप, बटर व इतर दुग्धजन्य पदार्थांवरील जीएसटी पूर्णपणे रद्द करावा, पुढील तीन महिन्यांसाठी थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर पाच रुपये अनुदान जमा करावे, आदी मागण्या करण्यात आल्या.सकाळी जामखेड तालुक्यातील चौंडी, पाढळी,काटेवाडी, घोडेगाव, पिंपरखेड,डोणगाव, बांदखडक, राजेवाडी,खर्डा, लोणी, खुरदैठण, दैवडाची वाडी, कवडगाव पाटोदा,साकत,जातेगाव, नायगाव, जामखेड या ठिकाणी दूध दरवाढीसाठी ग्रामदैवताला दुधाने अभिषेक घालण्यात आला. शहरात करण्यात आलेल्या आंदोलन प्रसंगी दक्षिण जिल्हाध्यक्ष सुनील लोंढे, तालुकाध्यक्ष मंगेश आजबे,संघटनाप्रमुख हनुमान उगले,युवक तालुकाध्यक्ष ॲड. हृषीकेश डुचे, शहरध्यक्ष भाऊसाहेब डोके,उपसरपंच बाळासाहेब ठाकरे,जनार्दन भोंडवे, नितीन जगताप,अशोक आजबे, प्रदीप वाळुंजकर, अप्पासाहेब डोके, बंडू मुळे,महादेव डोके, बाबू साळुंखे,आबासाहेब जाधव, अशोक जगदाळे, ईशर खैरे, अमोल खैरे,अशोक खैरे, तात्या भिसे, सागर लोंढे, विठ्ठल पोटे, अविराज मोरे,अश्विन खैरे यांच्यासह स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे विविध पदाधिकारी आणि शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

## सरकारकडून बऱ्याच बँकांचे खासगीकरणाबाबत हालचाली सुरु ?

नवी दिल्ली, (वृत्तसंस्था) दि. २१ – सध्या सरकारच्या मालकीच्या १२ बँका आहेत. त्यातील सात बँकांचे खासगीकरण करण्याबाबत सरकार गंभीरपणे पावले टाकत असल्याची चर्चा वाढली आहे. काही वृत्त माध्यमांनी काल अर्थमंत्रालयातील सूत्रांचा हवाला देऊन सरकार बऱ्याच बँकांचे खासगीकरण करण्याबाबत हालचाली करीत असल्याचे वृत्त दिले आहे.या बातम्याना सरकारकडून किंवा बँकांकडून कसल्याही प्रकारचा दुजोरा मिळाला नाही. अशा प्रकारच्या बातम्या वेळोवेळी सूत्रांचा हवाला देऊन जाहीर केल्या जातात. आता आलेल्या वृत्तात म्हटले आहे की, अर्थमंत्रालय सरकारच्या मालकीच्या केवळ ५ बँका असाव्यात अशा मताचे आहे. त्यामुळे उरलेल्या सरकारी बँकांचे भागभांडवल विकून खासगीकरण केले जाऊ शकते. सध्या लॉकडाऊनमुळे सरकारचा महसूल कमी झाला आहे. अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी सरकारला महसुलाची गरज आहे. कर्ज जास्त घेतल्यानंतर पतमानांकनावर परिणाम होतो. त्यामुळे शक्य असेल त्या सरकारी कंपन्यांची निर्गुंतवणूक करून काही प्रमाणात तरी निधी मिळवण्याच्या विचारात सरकार आहे. विशेष म्हणजे सरकारी बँकाचे एनपीए जास्त आहे. आगामी काळात ते वाढणार आहे. अशा अवस्थेत या सरकारी बँकांचे भागभांडवल विकल्यानंतर सरकारला पुरेसा निधी मिळेल की नाही याबाबत शंका आहे. तरीही ही केंद्र सरकार बँकांच्या निर्गुंतवणुकीसंदर्भात आग्रही आहे. या वर्षाचा अर्थसंकल्प सादर झाला तेव्हा अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी यावर्षी निर्गुंतवणुकीतून किमान दोन लाख कोटी रुपये उभा करण्याचे ठरविले होते. एलआयसीची शेअरबाजारात नोंदणी करून मोठा महसूल मिळेल, अशी अपेक्षा अर्थमंत्र्यांना आहे. मात्र, दरम्यानच्या काळामध्ये लॉकडाऊन निर्माण झाल्यामुळे शेअरबाजार निर्देशांक वाढत असले तरी बाजारातील परिस्थिती कमालीची अनिश्चित आहे. त्यामुळे निर्गुंतवणुकीला किती यश मिळेल याबाबत साशंकता आहे. बँकांच्या खासगीकरणाची चर्चा वाढल्यामुळे आज बऱ्याच सरकारी बँकांच्या शेअरच्या भावात सकाळी वाढ दिसून आली, ज्या बँकांच्या शेअरचे भाव सकाळी वाढले होते त्यामध्ये बँक ऑफ महाराष्ट्र, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, युको बँक, इंडियन ओव्हरसीज बँक या बँकांचा समावेश होता. भारताची अर्थव्यवस्था आता जवळजवळ तीन लाख कोटी डॉलरची झाली आहे. भारतातील बऱ्याच कंपन्या परदेशात गुंतवणूक करीत आहेत. परदेशातील बऱ्याच कंपन्या आणि गुंतवणूकदार भारतात गुंतवणूक करीत आहेत. असे व्यवहार हाताळण्यासाठी भारतातील बँकांचा आकार मोठा असण्याची गरज आहे असे केंद्र सरकारचे मत आहे.

## महाराष्ट्राची ओळख दर्शविणारी पिके कृषी विद्यापीठांनी विकसित करावी -मुख्यमंत्री



मुंबई, – महाराष्ट्राची ओळख दर्शविणारी पिके कृषी विद्यापीठांनी विकसित करावी.ज्याला बाजारपेठ आहे अशी पिके घ्यावीत. विद्यापीठातील संशोधनांमुळे शेतकऱ्यांच्या जीवनातील अनिश्चितता संपून त्यांच्या जीवनात बदल झाला पाहिजे, असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज येथे सांगितले.मुख्यमंत्र्यांनी आज राज्यातील कृषी विद्यापीठाच्या कुलगुरूंशी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून संवाद साधला. यावेळी कृषीमंत्री दादाजी भुसे, राज्यमंत्री डॉ.विश्वजित कदम, मुख्य सचिव संजय कुमार, मुख्यमंत्री कार्यालयातील प्रधान सल्लागार अजोय मेहता, कृषी विभागाचे सचिव एकनाथ डवले,महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. के.पी विशनाथा,डॉ बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ संजय सावंत, डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ व्ही.एम.भाले, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ कुलगुरू डॉ. अशोक ढवण यावेळी उपस्थित होते. (पान २ वर)

## जिल्हा न्यायालयासमोर दुचाकी वाहनांवर कारवाई

अहमदनगर – भिंगार कॅम्प पोलिसांनीवाहनचालकांविरूध्द कारवाई सुरू केली असुन पोलिस अधिक्षक कार्यालय ते भिंगार या रस्त्यावरून जिल्हा न्यायालया समोर सोमवारी सकाळी १० वा. सुमारे १०० वाहन चालकांविरूध्ददंडात्मक कारवाई केली.या कारवाईत विना नंबर दुचाकी, डबलसिट–ट्रिपलसिट असलेले वाहनचालक, फॅन्सी नंबरप्लेट लावलेल्या दुचाक्या तसेच मास्क न वापरणारे वाहनचालक यांच्या विरूध्द दंडात्मक कारवाई करण्यात आली. तसेच सिट बेल्ट न वापरणाऱ्या चारचाकी वाहन चालकांवरही कारवाई करण्यात आली. कोरोनाचा सर्वत्र प्रादुर्भाव वाढत असल्याने शासनाने दिलेल्या आदेश व सुचनांचे पालन करणे आवश्यक असताना नागरिकां कडुन सोशल डिस्टन्सचे पालन न होता सरकारी आदेशाची पायमल्ली होत आहे. त्यामुळे नागरिकांच्या जिविताचा प्रश्न उद्भवत आहे. या करीता भिंगार कॅम्प पोलिसांनी वाहन चालकांवर कारवाई सुरू केली असुन ही कारवाई कायमस्वरूपी सुरू राहणार आहे, अशी माहिती भिंगार कॅम्प पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रविण पाटील यांनी यावेळी बोलताना दिली. ही कारवाई स.पो.नि. प्रविण पाटील, पोलिस नाईक राजेंद्र सुद्रिक, पोलिस हवालदार बी.डी. आघाव यांच्यासह कॅम्प पोलिस ठाण्याचे पोलिस कर्मचाऱ्यांनी केली आहे. अचानक झालेल्या या कारवाईमुळे नगरहुन भिंगारकडे जाणारे नागरिक तसेच जिल्हाभरातुन जिल्हा न्यायालयात येणारे नागरिक व वकील यांची तारांबळ उडाली. या रस्त्याला पर्यायी रस्ता उपलब्ध नसल्यानेही नागरिकांना कारवाईला सामोरे जावे लागले.

## मुंबईतील पहिले हृदयप्रत्यारोपण यशस्वी नांदेडमधील ५३ वर्षीय महिलेला जीवनदान

मुंबई, मंगळवार – कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटलने आज कोव्हिड– १९ महामारीदरम्यान मुंबईतील पहिली हृदयप्रत्यारोपण प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केल्याचे जाहीर केले. हृदय प्रत्यारोपण करण्यात आलेली महिला ५३ वर्षीय असून मूळची नांदेडची आहे. त्यांचे हृदय निकामी झाले होते आणि हृदयाचे झालेले नुकसान भरून काढण्यासारखे नव्हते. त्यामुळे त्यांना हृदय प्रत्यारोपणाची गरज होती. गेल्या आठ महिन्यांपासून हृदय प्रत्यारोपणाच्या यादीत त्यांचे नाव समाविष्ट होते. दुर्दैवाने त्यांची स्थिती आणखी वाईट झाली व त्याचवेळेस कोव्हिड– १९ महामारीमुळे हृदय मिळण्याची शक्यताही कमी झाली, कारण अवयवदात्यांचे तसेच अवयव प्रत्यारोपणाचे प्रमाण या दरम्यान वेगाने कमी झाले होते. मात्र, १८ जुलै रोजी एका दात्याचे हृदय उपलब्ध झाले आणि कोव्हिड– १९ मुळे उद्भवलेल्या सर्व अडथळ्यांवर मात करत केडीएएचमधील डॉ. नंदकिशोर कपाडिया यांच्या नेतृत्वाखालील टीमने यशस्वीपणे त्यांच्यावर हृदय प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया केली.या रुग्णाच्या अवस्थेविषयी कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटलच्या हृद्य आणि फुप्फुस प्रत्यारोपण केंद्राचे संचालक डॉ. नंदकिशोर तापडिया म्हणाले, २००९ मध्ये या रुग्णावर ओपन हार्ट व्हॉल्व्ह रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया करण्यात आली होती. २०१२ मध्ये त्यांची स्थिती बिघडण्यास सुरुवात झाली. गेल्या वर्षी त्यांच्या हृद्याचे कधी न भरून येऊ शकणारे नुकसान झाल्याचे निदान झाले आणि पर्यायाने त्यांचे हृदय निकामी झाले. त्या गेल्या सहा महिन्यांपासून अंथरूणास खिळलेल्या होत्या. व्हॉल्व्ह रिप्लेसमेंटमुळे आधीच त्यांना रक्त पातळ करणारी औषधे दिली जात होती आणि शस्त्रक्रियेदरम्यान मोठ्या प्रमाणावर रक्तस्त्राव झाला.

## एकमेकांवर आरोप करणाऱ्या शिवसेना व राष्ट्रवादीने १७५ कोटीची फेज २ योजना मातीत घातली

अहमदनगर शहरात आज ज्या प्रकारे तपवन रस्ता, व प्रोफेसर कॉलनीतील लाईट घोटाळा यावरुन शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये जे आरोप प्रत्यारोप चालु आहे. ते फक्त जनतेची दिशाभुल करण्यासाठी चालु असुन मागील काळात जर पाहीले तर फेज २ सारखी संपूर्ण अहमदनगर शहराला पाणीपुरवठा करणारी १७५ कोटी च्या योजनेचे वाटोळे या दोन्ही पक्षांकडून झाले हे जनता विसरलेली नसून आपण दोघे भाऊ भाऊ मिळुन मिसळुन खाऊ अशी भुमिका शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षाची राहिलेली असून चौकशीच जर करायची असेल तर फेज २ योजनची करा, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हा सचिव नितीन भुतारे यांनी केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, १० वर्ष झाले तरी सुध्दा या योजनेचे काम का पुर्ण झाले नाही याचे उत्तर या दोन्ही पक्षांकडून जनतेने घेणे गरजेचे आहे. मागील १० वर्षात या दोन्ही पक्षांचीच व यांच्याच युती आघाडींची सत्ता होती त्यावेळी मात्र इतके आरोप प्रत्यारोप झाले नाही. फेज २ च्या अंतर्गत वहिन्याना यांच्याच कार्यकर्त्यांनी बोगस कनेक्शन मारुन पैसे कमवले हे जनतेला माहित नाही. बोगस कनेक्शनची चौकशी करा अशी मागणी आजपर्यंत या दोन्ही पक्षांकडून झाली नाही. फेज २ चे काम पुर्ण न झाल्यामुळे १० वर्षात करोडो रुपयांचा तोटा या दोन्ही पक्षांच्या सत्तेमुळे झाला हे ही जनतेला समजणे महत्वाचे आहे. त्यामुळे एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करण्यापेक्षा शहरातील जनतेला नळाद्वारे गढुळ पाणी येत आहे ते फेज २ ची योजना पुर्ण करुन बंद करा. जनतेला आरोग्य सुरक्षित कसे राहिल या कडे लक्ष द्या. तुमच्या आरोप प्रत्यारोपात जनतेला काही मिळत नाही.या शहरात कोन खर आणि कोण खोटे हे सिध्द करायच असेल तर विशेष महासभा बोलवुन फेज २ योजनेच्या कामा संदर्भात शेतपत्रिका काढा मग कोण भ्रष्टाचारी हे जनतेला समजेल. त्यामुळे जनतेची दिशाभूल थांबवा.

# ‘ऑक्सफर्ड’चे औषध प्रतिकारशक्ती वाढवणारे

लंडन, – करोना विषाणूविरोधात ऑक्सफर्ड विद्यापीठाने तयार केलेल्या औषधामुळे शरीरातील रोगप्रतिकारक शक्तीला उत्तेजन दिले जाते आणि या औषधाचा कोणताही धोका नसल्याचे संकेत मिळत असल्याचे शास्त्रज्ञांनी सोमवारी जाहीर केले. या औषधाच्या मानवी चाचणीच्या पहिल्या टप्प्यानंतर हे सकारात्मक संकेत दिले गेले आहेत. करोनाच्या उपचार प्रक्रियेतील ही मोठी सकारात्मक बाब आहे.क्लिनिकल चाचणीच्या भाग म्हणून एप्रिल ते मे या कालावधीत १८ ते ५५ वयोगटातील १,०७७ निरोगी प्रौढांना या लसीचे डोस देण्यात आले होते. त्या चाचणीचा निष्कर्श लॅन्सेट मेडिकल जर्नलमध्ये प्रसिद्ध करण्यात आला. लस दिल्यानंतर ५६ दिवसांपर्यंत त्यांच्या शरीरात तीव्र अॅन्टीबॉडी आणि टी-सेल प्रतिकारक शक्ती प्रेरित केल्याचे परिणाम दिसून आले. विषाणूंपासून कित्येक वर्षांपर्यंतच्या संरक्षण कायम टिकवण्यासाठी टी-सेल अतिशय महत्वाच्या असतात. हे निष्कर्श निश्चितच आशादायक आहेत. मात्र तज्ञांच्या म्हणण्यानुसार ही लस दीर्घकाळासाठी उपयोगी आहे की नाही याबाबत आताच सांगता येऊ शकणार आही. त्यासाठीच्या व्यापक चाचण्या सध्या सुरू आहेत. या लसीचा करोना विषाणूच्या साथीवर परिणाम होऊ शकेल की नाही हे ठामपणे सांगण्यापूर्वी अजून बरेच काम बाकी आहे, असे या शोधनिबंधाच्या प्रोफेसर सारा गिलबर्ट यांनी म्हटले आहे.

# गुणवत्तेच्या नावाखाली ‘त्यांना’ गल्ला भरायचाय

अहमदनगर – प्रारंभीपासूनच ज्यांनी तपोवन रस्त्याच्या कामात आठकाठी आणली. त्यांना आता गुणवत्तेच्या नावाखाली गल्ला भरायचा आहे. वास्तविक रस्त्याचे काम निकृष्ट झाल्याची तक्रार अगोदर काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगरसेवकांनीच केली होती. आता त्यातून केवळ राजकीय पोळी भाजून घेण्याचा माजी आमदारांचा प्रयत्न असल्याची टीका महानगरपालिका विरोधी पक्षनेते संपत बारस्कर यांनी केली.तपोवन रस्त्याच्या मुद्यावर आज बारस्कर यांच्यासह काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगरसेवकांनी पत्रकारांशी संवाद केला. नगरसेवक कुमार वाकळे, विनीत पाऊलबुधे, सुनील त्रिंबके व डॉ. सागर बोरुडे, माजी नगरसेवक बाळासाहेब पवार, निखिल वारे आदी यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून रस्ता मंजूर करुन आणण्याचे श्रेय आमदार संग्राम जगताप यांचेच आहे. माजी आमदारांनी हा रस्ता ग्रामसडक योजनेतून होवूच नये, यासाठी प्रयत्न केले. त्यासाठी त्यांनी शिवसेनेच्याच जिल्हा परिषदेतील नेत्यांस पत्रव्यवहार करायला लावले. विशेष म्हणजे गेली पंचवीस वर्षे हा रस्ता खुलाच नव्हता. त्यावेळी मात्र ते गप्प बसले होते. त्यावेळी काम करण्यास त्यांना कोणी अडविले होते?, असा सवाल या नगरसेवकांनी केला. आमदार जगताप यांनीच हा रस्ता खुला केला. पहिल्या टप्प्यात पाच लाख रुपये खर्चुन किमान वापराजोगा रस्ता जगताप यांनीच तयार केला होता. दरम्यान, या रस्त्याचे काम सुरु असताना ते निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे लक्षात आल्याने प्रभाग एक, दोन व सातमधील नगरसेवकांनी किमान आठ वेळा काम बंद पाडले होते. आमदारजगताप यांनीच पालकमंत्री हसनमुश्रीफ यांच्याकडे तक्रार केल्यानेरस्त्याच्या तपासणीचे आदेश झाले असल्याचा दावाही बारस्कर यांच्यासह उपस्थित नगरसेवकांनी केला.

# महाराष्ट्राची ओळख दर्शविणारी पिके कृषी विद्यापीठांनी विकसित करावी -मुख्यमंत्री

कृषी विद्यापीठे चांगले काम करत आहेत. परंतू त्यांच्या कामातून भविष्यात शेती आणि शेतकऱ्याला आणखी पुढे कसे नेता येईल याचा मार्ग दिसला पाहिजे. शेती आणि शेतकऱ्यांच्या जीवनातील अनिश्चितता संपवण्याची गरज आहे. संघटित शेती आणि संघटित शेतकरी ही संकल्पना राबवून जे विकले जाईल तेच पिकवायची गरज असून शेतकऱ्यांना संघटित करतांना विभागवार निश्चित केलेल्या दर्जाचीच पिके पिकतील,ती बाजारपेठेत विकली जातील यादृष्टीने शेतकऱ्यांशी संवाद साधून मार्गदर्शन करावे. अशा उत्पादनांना,शेतमालाला बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी त्याचे मार्केटिंग कसे करता येईल याचाही विचार व्हावा, असे त्यांनी सांगितले.दुध कांदा, कापूस अशा वेगवेगळ्या पिकांबाबतीत असलेली अनिश्चितता संपवायची आहे यासाठी प्रत्येक पिकाचे, वाणाचे वेगळेपण ओळखून पिके घ्यावीत. त्यासाठी महाराष्टजएाची विभागवार मांडणी करून फळ, धान्य, प्रक्रिया उद्योग यांची निश्चिती करावी, त्यांचा दर्जा राखतांना आपली उत्पादने जागतिक दर्जाची आहेत का, याचा अभ्यास करावा, अशी सूचना मुख्यमंत्र्यांनी केली.विभागवार पिके पिकवणाऱ्या शेतकऱ्यांची सभासद नोंदणी शासनाकडे व्हावी, त्याला चांगले बियाणे, खते देऊन बळकटी देतांना बाजारपेठेची शोशती देण्याचे प्रयत्न व्हावेत. उत्पादन वाढले परंतू शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न झाला पाहिजे, शेतकरी स्वत:च्या पायावर उभा राहिला पाहिजे. कृषी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी प्रयोगशीलता दाखवावी तसेच कृषी विद्यापीठाच्या प्रयोगाचा शेतकऱ्यांना लाभ व्हावा. प्रयोग फक्त प्रदर्शनात न राहाता त्याची सार्वत्रिक अंमलबजावणी व्हावी. निर्यातक्षम उत्पादने घ्यावीत. ती स्थानिक बाजारपेठेत ही विकावीत. आपल्या लोकांनाही त्यामुळे उत्तम दर्जाचे अन्न मिळेल, असे त्यांनी सांगितले.

# ग्रामीण रुग्णालयात ३८ बेडचे कोविड हॉस्पिटल




पारनेर, – पारनेर येथे खासगी डॉक्टरांच्या पुढाकाराने कोविड हॉस्पिटल सुरू करण्यात आली आहे. ग्रामीण रुग्णालयात सुरू करण्यात आलेल्या या हॉस्पिटमध्ये तालुक्यातील बाधित रुग्णांना ठेवण्यात येणार आहे. या हॉस्पिटलमध्ये ३८ बेडची व्यवस्था करण्यात आली आहे. सध्या येथे २१ बाधित रुग्णांवर उपचार करण्यात येत आहेत. तालुक्यातील सुपा येथे दोन खासगी रुग्णालयांना कोविड सेंटर म्हणून ताब्यात घेतले होते.मात्र तालुक्यात करोना रुग्णांची वाढती संख्या पाहता तालुक्यात अनेक ठिकाणी खासगी हॉस्पिटल कोविड रुग्णालय म्हणून ताब्यात घेतल्यावर तेथे लागणारा डॉक्टर, नर्स व आरोग्य कर्मचाऱ्यांचा स्टाफ उपलब्ध कसा करायचा, हा मोठाप्रश्न निर्माण झाला होता. त्यावर पर्याय म्हणून खासगी डॉक्टरांच्या पुढाकारातून पारनेर ग्रामीण रुग्णालयात कोविड हॉस्पिटल तयार करण्यात आले असून, तेथे ३८ बेड उपलब्ध करून देण्यात आले आहेत. गरजेनुसार त्यात वाढही करण्यात येणार आहे. यामुळे करोना बाधितांना एकाच जागेवर सर्व सुविधा मिळणार आहेत. ग्रामीण रुग्णालयात करोनाबधितांसाठी हॉस्पिटल सुरू करण्यात आल्यामुळे गरीब व गरजू रुग्णांसाठी पारनेरमधील खासगी डॉक्टर मोफत सेवा पुरवणार आहेत. कोविड हॉस्पिटलसाठी डॉ. श्रीकांत पठारे, डॉ. बाळासाहेब पठारे, डॉ. आर. जी. सय्यद, डॉ. संदीप औटी, डॉ. बाळासाहेब कावरे, डॉ. विजय जगताप आदींचे सहकार्य लाभले आहे.

# मी भारताचा पंतप्रधान आहे मला माझ्या व्यक्तिगत प्रतिमेची चिंता नाही, अशा शब्दांत मोदी चीनला समज देऊ शकतील काय : राहुल गांधी



नवी दिल्ली, – काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आणखी एक व्हिडिओ जारी करून चीन प्रकरणावरून मोदींच्या विरोधात पुन्हा हल्लाबोल केला आहे. मोदींनी आपण सशक्त नेता असल्याची एक नकली प्रतिमा तयार केली होती. आता त्यांची हीच भूमिका भारताच्या कमकुवतपणाला कारणीभूत ठरली आहे, असा आरोप त्यांनी या व्हिडिओमध्ये केला आहे.राहुल गांधी यांनी त्यात म्हटले आहे की, सत्तेवर येण्यासाठी मोदींनी आपण फार सशक्त नेता आहोत असे चित्र निर्माण केले होते. त्यांची हीच प्रतिमा भारताच्या कमकुवतपणाला कारणीभूत ठरली आहे. चीनला आज साऱ्या जगाचीच रचना बदलायची आहे.ते कोणतीही कृती निश्चित धोरण आखल्याशिवाय करीत नाहीत.त्यांनी त्यांच्या कल्पनेनुसार जागाचा नकाशा आखला आहे आणि तो वास्तवात आणायचा प्रयत्न त्यांनी सुरू केला आहे. ग्वादर बंदराचा विकास, त्यांचे बेल्ट आणि रोड प्रकल्प ही सारी त्याचीच लक्षणे आहेत. त्याच धोरणाचा भाग म्हणून चीन गलवान, देमचोक,पँगाँग तलाव या भागात ते आपली स्थिती अधिक सशक्त करीत आहे. भारताने त्या भागात बांधलेले रस्ते त्यांना डाचत होते. त्यातून हा सारा प्रकार घडला आणि आता याहीपेक्षा अधिक आक्रमक भूमिकेतून ते पाकिस्तानच्या साथीने काश्मीरमध्येही काही कारवाया करण्याचा प्रयत्न करतील. त्यामुळे भारत आणि चीन यांच्यातील तणाव हा केवळ सीमा भागातील तणाव समजता येणार नाही. त्यांनी आपल्या पंतप्रधानांच्या प्रतिमेवरच हल्ला करून ती नष्ट करण्यासाठी सीमाभागात कारवाया केल्या.मोदींनी आपली प्रतिमा ५६ इंची छातीची केली आहे. आपली कार्यक्षम राजकारणी ही प्रतिमा जपण्यासाठी मोदींना आपली ५६ इंची प्रतिमा जपावी लागणार आहे. चीनला त्यांच्या याच प्रतिमेवर हल्ला करून त्यांची ही प्रतिमा नष्ट करायची आहे. आम्ही सांगतो त्यानुसार तुम्ही वागला नाहीत तर तुमची सशक्त नेता ही प्रतिमाच आम्ही संपवून टाकू,असाच इशारा चीनने दिला आहे.आता या साऱ्याला मोदींकडे काय उत्तर असेल हे महत्त्वाचे आहे. आता मोदी चीनला सांगू शकतील काय की मी तुमच्याशी दोन हात करायला तयार आहे, मी भारताचा पंतप्रधान आहे मला माझ्या व्यक्तिगत प्रतिमेची चिंता नाही, अशा शब्दांत मोदी चीनला समज देऊ शकतील काय, असा सवाल राहुल गांधी यांनी उपस्थित केला आहे. चीनला ते समर्थपणे सामोरे जातील की त्यांच्या दबावापुढे ते झुकतील हे आता बघावे लागेल.पण पंतप्रधान त्यांच्यापुढे झुकले आहेत ही माझी चिंता आहे, असे मतही राहुल गांधी यांनी व्यक्त केले आहे. आज चीनने भारतीय हद्दीत अतिक्रमण करूनही चीन आपल्या हद्दीत घुसलेलाच नाही,असे मोदींचे म्हणणे म्हणजे त्यांनी चीनपुढे झुकल्याचेच स्पष्ट लक्षण आहे, असा आरोपही राहुल गांधी यांनी केला आहे.आज मोदी हे आपल्या प्रतिमेच्या चिंतेत आहेत आणि ती प्रतिमा जपण्यासाठीच मोदी चीनला आव्हान देण्यापेक्षा त्यांची घुसखोरी निमूटपणे मान्य करणार असतील तर असा पंतप्रधान देशाच्या उपयोगाचा नाही, असेही राहुल गांधी यांनी म्हटले आहे

अन्याय,अत्याचार आणि भ्रष्टाचाराला वाचा फोडणारे एकमेव निर्भिड वृत्तपत्र
दर्शक
e-mail - weeklydarshak@gmail.com
दर्शकचे वार्षिक सभासद व्हा
जाहिरातींसाठी संपर्क करा
संपर्क
दर्शकभवन,सरोष बाग,झेंडीगेट,
अहमदनगर-४१४००१ महाराष्ट्र
मो.97 63 03 03 86
76 66 60 26 60

साप्ताहिक दर्शक
हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशन,संस्थापक संपादक शेख रियाजोद्दीन फजलोद्दीन यांनी दर्शकभवन,७२६,सरोष प्रिंटर्स,दिपाली थिएटर समोर,झेंडीगेट रोड,अहमदनगर ४१४००१ महाराष्ट्र येथे मुद्रीत करून येथेच प्रकाशित केले.बातम्यांची जबाबदारी कार्य.संपादक शेख आदिल रियाजोद्दीन यांच्यावर राहील मो.९७६३०३०३८६, ७६६६६०२६६० (अहमदनगर न्यायकक्षेत)

# फोटो मॉर्फिंग करुन व्हायरल करण्याची धमकी देणाऱ्यास सायबर पोलीसांनी सापळा रचून पकडले

अहमदनगर- फेसबुक अकाऊंट वरुन फोटोकॉपी करुन त्याचे मॉफींग करुन अश्लिल फोटो बनवून खंडणी मागणाऱ्यास सायबर सेल पोलिसांनी सापळा रचून पाठलाग करुन शिताफीने अटक केली. ही कारवाई गुरुवारी (दि.१६) केली. याबाबतची अधिक माहिती अशी की, २९ वर्षीय युवकाच्या फेसबुक अकाऊंटवरुन फोटो अज्ञात इसमाने कॉपी करुन त्यांचे मॉफींग करुन अश्लिल फोटो बनवून त्याच्या



व्हॉटस्‌अ‍ॅपवर पाठविले व सदर फोटो सोशल मिडीयावर व्हायरल न करण्यासाठी ३० हजार रुपयांची खंडणी मागितली.याबाबत सायबर पोलिस ठाण्यात अज्ञात इसमाविरुद्ध भारतीय दंड विधान ३८४ सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६७ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास करताना सायबर सेल पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण करुन हा गुन्हा उघडकीस आणला तसेच गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळवून राहुरी तालुक्यातील वांबोरी येथे सापळा रचून अमोल उत्तम कुसमुडे (वय २९) यास अटक करण्या करीता गेले असता पोलिसांना पाहताच कुसमोडे याने पळण्याचा प्रयत्न केला.पोलिसांनी पाठलाग करुन त्यास अटक केली. त्याच्याकडील ५ हजार रुपये किंमतीचा गुन्ह्यात वापरलेला मोबाईल जप्त केला. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने वांबोरी गावातील खलवाडी येथील दोन ३० वर्षीय युवकांच्या पती-पत्नीचे फोटो घेऊन मॉफींग करुन अश्लिल फोटो बनविले व फोटो व्हायरल करण्याची धमकी दिली, अशी माहिती चौकशीत निष्पन्न झाली. यावरुन सायबर पोलिसांनी कुसमोडे याच्याविरुद्ध तीन वेगवेगळ्या गुन्ह्याची नोंद केली असून त्यास अटक करुन न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने आरोपीस पोलिस कोठडीची शिक्षा सुनावली. ही कारवाई पोलिस अधीक्षक अखिलेशकुमारसिंह यांच्या मार्गदर्शन व सुचनेवरुन सायबर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक अरुण परदेशी यांच्या पथकातील पोलिस उपनिरीक्षक प्रतिक कोळी, पोलिस हवालदार उमेश खेडकर,पोलिस नाईक मल्लिकार्जुन बनकर, दिगंबर कारखेले, राहुल हुसळे, पोलिस नाईक विशाल अमृते, पोलिस कॉन्स्टेबल अरुण सांगळे, महिला पोलिस नाईक स्मिता भागवत, अभिजित अरकल, राहुल गुंडू, चालक पोलिस हवालदार वासुदेव शेलार यांनी केली आहे. अधिक तपास पोलिस निरीक्षक अरुण परदेशी हे करीत आहेत.

# खाबूगिरीत माहीर असलेल्यांकडून तपोवनचे सत्य लपवण्यासाठी खोटेनाटे आरोप

अहमदनगर- आरोप करणाऱ्यांना स्वत:च्या नेत्याला विचारावा. तपोवन रस्त्याच्या कामात डल्ला मारण्याचा प्रयत्न शिवसेनेमुळे हाणून पडण्याच्या भितीने घाबरगुंडी उडालेल्या विरोधकांकडून मी महापौर असताना मंजूर प्रोफेसर कॉलनी परिसरातील पथदिव्यांच्या कामांबाबत चुकीचे व दिशाभूल करणारे आरोप करण्यात येत आहेत.मुळात या परिसरात पथदिवे बसविण्याचे काम विद्यमान आमदारांनी बंद पाडले होते. सदर कामच पूर्ण न झाल्याने कामाचे बिलही ठेकेदाराला अदा करण्यात आले नाही. ही वस्तुस्थिती आरोप करणारांनी आधी स्वत:च्याच नेत्याकडून माहिती करून घ्यायला हवी होती. बिले अदा झालेली नसताना पथदिव्यांध्ये घोटाळा झाला हे त्यांचे म्हणणे हास्यास्पद आहे. उलट मीच आता या कामाची सखोल चौकशी करावी अशी मागणी करणार आहे. विरोधकांनी या पथदिव्यांचे काम पूर्ण का झाले नाही याचे उत्तर स्वत:च्याच नेत्याला मागितले पाहिजे. चुकीचे आरोप करण्याच्या नादात ते स्वत:च्याच नेत्याला अडचणीत आणत आहेत, याचे भानही त्यांना राहिले नाही. खाबूगिरीत माहीर असलेल्यांकडून तपोवनचे सत्य लपवण्यासाठी खोटेनाटे आरोप करण्याचा केविलवाणा प्रयत्न सुरु आहे, असे जोरदार प्रत्युत्तर माजी महापौर अभिषेक कळमकर यांनी दिले आहे. मनपातील विरोधी पक्षनेते संपत बारस्कर यांनी प्रोफेसर कॉलनी परिसरातील पथदिव्यांच्या कामात ५० लाखांचा घोटाळा झाल्याचा आरोप करीत माजी महापौर अभिषेक कळमकर यांच्याकडे बोट दाखवले होते. या आरोपाला कळमकर यांनी प्रत्युत्तर दिले असून जे स्वत:च न बसवलेल्या पथदिव्यांच्या घोटाळ्यात आकंठ बुडालेले आहेत, त्यांनी असे आरोप करणे संयुक्तिक नसल्याचे कळमकर यांनी म्हटले आहे. कळमकर म्हणाले की, बीआरजीएफमधून ५० लाखांच्या निधीतून सदर काम प्रस्तावित करण्यात आले होते. परंतु, हे काम विद्यमान लोकप्रतिनिधींच्या दबावामुळे ठेकेदाराने पूर्ण केले नाही. ठेकेदाराचे बिलही थांबवण्यात आलेले असताना त्यात घोटाळा कसा होवू शकतो याचे उत्तर आरोप करणारांनी दिले पाहिजे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे जे आज पथदिव्यांबाबत आरोप करीत आहेत, त्यांचेच हात न बसवलेल्या पथदिव्यांचा मलिदा खाताना बरबटलेले आहेत.'लोटके' प्रकरणामुळे त्यांची उडालेली भंबेरी अजून अहमदनगरची जनता विसरलेली नाही. शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख गिरीश जाधव म्हणाले की, दुसऱ्यांची चांगली कामे डोळ्यात खुपणाऱ्यांचे उपनगरातील अनेक नसते उद्योग बाहेर काढता येतील. सावेडी कचरा डेपोला विरोध करून तो हलविण्याची भूमिका घेणाऱ्यांनी नंतर कोणता मलिदा मिळाल्याने कचरा डेपो स्थलांतराचा विषय सोडून दिला याचेही उत्तर मिळणे अपेक्षित आहे. कचरा डेपो चालवणाऱ्यावर अचानक मेहेरनजर का करण्यात आली हाही प्रश्न आहे. तपोवनचे बिंग फुटल्याने दिशाभूल करणारे आरोप करण्याचा उद्योग सुरु करणारांनी विचारपूर्वकच आरोप केले शिवसेनेचे उपशहरप्रमुख दीपक सावंत म्हणाले की, माजी नगरसेवक निखील वारे हेही सध्या राष्ट्रवादीच्या मांडीला मांडी लावून खोटेनाटे आरोप करीत आहेत. परंतु, ज्यांनी लोकसभेला भाजपचा झेंडा हाती घेतला व नंतर विधानसभेला राष्ट्रवादीचा झेंडा मिरवला, अशा लोकांच्या बोलण्याची विशासर्हता किती असू शकते. जिथे माल तिथे सर्वात पुढे अशी प्रवृत्ती असलेल्यांच्या निराधार व बेछूट बोलण्याकडे दुर्लक्षच केलेले बरे. माजी तोतया नागरसेवकांकडे लक्ष देण्याची गरज नाही. स्वत:च्या स्वार्थासाठी सतत झेंडे बदलून काम करण्याचा आव आणणाऱ्यांचे म्हणणे किती गांभीर्याने घ्यायचे हे नगरच्या जनतेला चांगलेच माहिती आहे.

## कोरोना योद्धांच्या सत्कार समारंभ संपन्न



अहमदनगर (संगमनेर) : अहमदनगर जिल्हा अल्पसंख्याक सेवाभावी संस्थेच्या वतीने कोरोना योद्धांच्या सत्कार समारंभ संपन्न झाला त्याप्रसंगी जे.यु.सी.अध्यक्ष शेख ईदरीस यांचा संगमनेर शहर पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री.अभय परमार यांच्या हस्ते कोरोना योद्धा सन्मानपत्र देतांना दस्तगीर शाह रशीद गुरुजी,सय्यद असिफ अली इत्यादी.

## युरिया खताची टंचाई दूर व्हावी यांची आ.आशुतोष काळे पालकमंत्री नामदार हसन मुश्रीफ यांच्याकडे मागणी

कोपरगाव । कोपरगाव विधानसभा मतदार संघातील शेतकऱ्यांना युरिया खताची टंचाई जाणवत असून हि टंचाई दूर व्हावी अशी मागणी आ.आशुतोष काळे यांनी पालकमंत्री नामदार हसन मुश्रीफ यांच्याकडे केली असून पालकमंत्र्यांनी या मागणीची दखल घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबत वैयक्तिक लक्ष घालून निर्माण युरिया टंचाई दूर करावी आदेश दिले आहे.कोपरगाव तहसील कार्यालय येथे अहमदनगर जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार हसन मुश्रीफ यांनी व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे कोपरगाव विधानसभा मतदार संघामध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करण्यात आलेल्या उपाय योजनांचा आढावा घेतला. यावेळी आ. आशुतोष काळे यांनी कोपरगाव तालुक्यातील कोरोना बाधित रुग्णांची सदस्य स्थिती रुग्णांवर सुरु असलेले उपचार याची सखोल माहिती दिली.त्याच बरोबर मतदार संघातील अनेक समस्यांकडे देखील पालकमंत्र्यांचे आमदार आशुतोष काळे यांनी यावेळी लक्ष वेधले.यामध्ये प्रामुख्याने शेतकऱ्यांना निर्माण झालेल्या युरिया खत टंचाई तातडीने दूर करण्यासाठी पालक मंत्र्यांना साकडे घातले.यावर्षी पर्जन्यमान चांगले होत असून शेतकऱ्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शेतात पेरण्या केल्या आहेत. सर्व पिके जोमात आहेत. मात्र मतदार संघात युरिया खताची टंचाई निर्माण झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या चिंता वाढल्या असून पिकांना वेळेवर युरिया मिळाली नाही तर उत्पन्नात घट होवून शेतकऱ्यांचे नुकसान होवू शकते.त्यासाठी लवकरात लवकर युरिया खताचा साठा उपलब्ध व्हावा अशी मागणी केली. त्यावेळी पालकमंत्र्यांनी तात्काळ जिल्हाधिकारी राहुल द्विवेदी यांना याबाबत आदेश कोपरगाव मतदार संघात निर्माण झालेली युरिया टंचाई दूर करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करण्याचे आदेश दिले.

# 'आयएमए'चा इशारा; दर दिवसाची रुग्णसंख्या गंभीर

नवी दिल्ली/ प्रतिनिधी : देशात कोरोना विषाणूचे दहा लाखांहून अधिक रुग्ण समोर आल्यानंतर इंडियन मेडिकल असोसिएशनने (आयएमए)ोस देशात कोरोनाचा समूह संसर्ग सुरु झाला असल्याचे म्हटले आहे. इंडियन मेडिकल असोसिएशन-च्या बोर्ड ऑफ इंडियाचे अध्यक्ष डॉ. व्ही. के मोंगा यांनी याबाबत महत्वाचे वक्तव्य केले. डॉ. मोंगा म्हणाले की, प्रत्येक दिवशी देशात ३० हजारहून जास्त रुग्ण समोर येत आहेत. ही फार गंभीर स्थिती आहे. आता हा संसर्ग देशातील ग्रामीण भागातदेखील सुरु झाला, याचा अर्थ असा आहे की, देशात कम्युनिटी ट्रांसमिशन सुरु झाले आहे, असे डॉ. मोंगा यांनी सांगितले. येणाऱ्या काळात कोरोना संसर्गाची स्थिती अधिक गंभीर होणार असल्याचा अंदाज वर्तवला जात असून, समूह संसर्गाच्या स्थितीत संसर्ग झालेल्या व्यक्तीला कुणाकडून आणि कोठे संसर्ग झाला याचा तपास करणे अशक्य होते आणि त्यामुळे संसर्गाचा वेगही वाढतो. डॉ. मोंगा म्हणाले, की कोरोना विषाणू आता ग्रामीण भागातही पसरत आहे. त्यामुळे परिस्थितीवर नियंत्रण मिळवणे कठीण झाले आहे. दिल्लीमध्ये आपण कोरोनावर नियंत्रण मिळवले. मात्र महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ, गोवा आणि मध्य प्रदेशमधील दुर्गम भागात काय होणार? असे ते म्हणाले. कोरोना हा असा आजार आहे, जो खूप वेगाने पसरत आहे. त्यामुळे त्याचा सामना करण्यासाठी राज्य सरकारांनी संपूर्ण सावधगिरी बाळगली पाहिजे, तसेच केंद्र सरकारची मदत घेतली पाहिजे. या व्हायरल आजाराला रोखण्यासाठी ७० टक्के लोकसंख्येची रोगप्रतिकारक क्षमता वाढवण्यावर लक्ष द्यावे, असेही त्यांनी सांगितले. दरम्यान, केंद्रीय आरोग्य मंत्रालय देशात समूह संसर्ग सुरू झाला नसल्याचा दावा सातत्याने करत असतानाच डॉ. मोंगा यांनी केलेल्या या विधानाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

# राहुरी कारखाना येथे पती-पत्नी कोरोनाबाधीत

देवळाली प्रवरा । देवळाली प्रवरा नगरपालिका हद्दीतील राहुरी कारखाना येथे ताहाराबाद रोड लगत असलेल्या एका वसाहत मध्ये पती पत्नी असे दोघे कोरोनोबाधित असल्याचे खाजगी प्रयोगशाळेच्या तपासणीतून निष्पन्न झाले आहे. देवळाली प्रवरा नगरपालिका हद्दीत ७ व्यक्ती कोरोना बाधीत निघाले आहेत. तर कराळेवाडी येथील एक वसाहतीत लॉंकडाऊन करण्यात आले या वसाहतीतील शिवराज तारडे यास नगर पालिका कामगारांनी बाहेर जावू दिले नाही नगर पालिका कामगारास शिविगाळ केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी राहुरी कारखाना येथील ताहाराबाद रोड लगतअसलेल्या वसाहती मधील पती पत्नी कोरोना बाधीत आढळले आहेत. या दोघांनी खाजगी प्रयोग शाळेत स्त्रावची तपासणी करुन घेतली होती. त्यात ते बाधीत आढळले. दोन दिवसापुर्वी एकप्रगतशिल शेतकरी कोरोना बाधीत आढळला होता. त्याच्यावर उपचार चालू असुन त्याच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींचा शोध प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकिय अधिकारी आण्णासाहेब मासाळ व त्यांचे पथक मुख्याधिकारी अजित निकत शोध घेत असताना सातत्याने संपर्कात असलेले पती पत्नी यांचा स्त्राव खाजगी प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविला असता ते दोघेही बाधीत असल्याचे निष्पन्न झाले. नगरपालिकेने कॉंन्टेमेंटझोन जाहीर करण्यात आला आहे.













# केंद्र सरकारचा दूध भुकटी आयातीचा निर्णय घात करणारा : ना. थोरात



संगमनेर, दि. २१ - दूध उत्पादक शेतकऱ्यांची परवड ही भाजप सरकारचे पाप आहे. त्यामुळे त्यांना दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या नावावर आंदोलन करण्याचा नैतिक अधिकार नाही. भाजपने आता स्व:च्या विरोधात आंदोलन करून पापक्षालन करावे, अशी टीका महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली आहे. ना. थोरात म्हणाले, गेल्या पाच वर्षांत केंद्रातील आणि राज्यातील भाजप सरकारने दूध उत्पादक शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले होते. दूध दराच्या प्रश्नावर आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांनी फडणवीस सरकारच्या मंत्र्यांना दिलेला प्रसाद महाराष्ट्र अजून विसरला नाही. करोनाचे गंभीर संकट असताना शहरांमध्ये दुधाची मागणी पूर्णपणे मंदावली आहे. त्यामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांसमोर गंभीर संकट निर्माण झाले आहे. अशावेळी राज्य सरकारने शेतकऱ्यांचे दूध स्वत: खरेदी करून ते भुकटीच्या रूपात साठवण्याचा निर्णय घेऊन अंमलात आणला आहे. राज्यात आणि देशात मोठ्या प्रमाणात दूध भुकटी उपलब्ध असताना मोदी सरकारने १० हजार मेट्रिक टन दूध भुकटी आयात करण्याचा निर्णय घेतला, जो शेतकऱ्यांच्या मूळावर उठणारा आहे. दुधाचे भाव त्यामुळे ८ ते ९ रुपये प्रतिलिटर पडतील. एके ठिकाणी दूध पावडर आयात करायची आणि दुसरीकडे दूध पावडरसाठी अनुदान मागायचे, हा दुटप्पीपणा भाजपच करू शकते, असेही थोरात म्हणाले. मोदी सरकारने या संकटकाळात केलेल्या इंधन दरवाढीचा मोठा फटका शेतकऱ्यांना आणि दूध संघांना बसला आहे. दुधाला प्रतिलिटर ५ रुपये अनुदान देण्याचा निर्णय शेतकऱ्यांच्या प्रचंड संघर्षामुळे इच्छा नसताना त्यांना घ्यावा लागला. पण काही महिन्यांनंतर त्यांनी ही योजनाही गुंडाळून टाकली. त्यामुळे आज १० रुपये अनुदान मागण्याचा नैतिक अधिकार त्यांना नाही. मागील पाच वर्षांतील भाजप सरकारच्या दूध दराबातच्या फसव्या घोषणा आणि भाषणांची एक पुस्तिका प्रकाशित करावी, जेणेकरून भाजपचा खरा चेहरा जनतेसमोर येईल, असेही ते म्हणाले.




महक रही है ज़मीं चांदनी के फूलों से
ख़ुदा किसी की मुहब्बत पे मुस्कुराया है - बशीर बद्र

## अमेरिकेतील संसदेच्या प्रतिनिधीगृहामध्ये भारत-चीन सिमावादवर एक ठराव

वॉशिंग्टन, दि. २० - भारतीय सीमेवर चिनी सैन्याने केलेल्या घुसखोरीची दखल घेऊन अमेरिकेतील दोन्ही पक्षातील ९ विशेष प्रभावी खासदारांच्या गटाने अमेरिकेतील संसदेच्या प्रतिनिधीगृहामध्ये एक ठराव मांडला आहे. या ठरावानुसार सीमेवरील तणाव कमी करण्यासाठी बळाचा वापर न करता उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या यंत्रणेचा वापर करावा, अशी मागणी चीनला करण्यात आली आहे.पूर्व लडाखमधील प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर अनेक भागात भारत आणि चीनचे सैन्यामध्ये ५ मे पासून कोंडी निर्माण झाली आहे. गेल्या महिन्यात गलवान खोऱ्यामध्ये झालेल्या चकमकीत भारतीय लष्कराचे २० जवान शहिद झाले होते. चीनने सीमेजवळ ५ हजार सैनिक जमा केले होते. तणाव कमी करण्यासाठी लष्करी अधिकाऱ्यांच्या पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. या लष्करी तणावाला चीनची आक्रमक भूमिकाच जबाबदार असून केवळ भारताच्या सीमेवरच नाही, तर भूतान, दक्षिण चीन समुद्र, सेन्काकू बेटांवर, हाँगकाँग आणि तैवानमध्येही चीनची आक्रमकता दिसून येते आहे. त्यामुळे चीनने बळाचा वापर न करता उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या यंत्रणेद्वारे तणाव कमी करावा, अशी मागणी करणारा ठराव या खासदारांनी केला आहे. भारतीय वंशाचे अमेरिकेतील खासदार राजा कृष्णमूर्ती आणि रो खन्ना आणि फ्रँक पॅलोन, टॉम सुझ्झी, टेड योहो, जॉर्ज होल्डिंग, शीला जॅक्सन-ली, हेली स्टीव्हन्स आणि स्टीव्ह चाबोट या अन्य भारतीय-अमेरिकन खासदारांनी हा ठराव मांडला आहे. होल्डिंग आणि ब्रॅड शर्मन यांच्या नेतृत्वात आणि इतर सात सदस्यांनी या ठरावावर अनुमोदनाची स्वाक्षरी केली आहे. गेल्या आठवड्यात, सिनेटच्या परराष्ट्र संबंध समितीचे रँकिंग सदस्य, बॉब मेनंडेझ यांनीही भारत-अमेरिकेतील भागीदारीचा हवाला देऊन चीनला आंतरराष्ट्रीय निकषांचा मान राखायला आणि वाद सामोपचाराने सोडवण्याचे आवाहन केले होते. भारताच्या सीमेवर आणि जगात अन्यत्रही चीनच्या आक्रमक भूमिकेमुळे चिंता व्यक्त करावी लागते आहे. असेही या ठरावामध्ये म्हटले आहे. रिपब्लिकन सिनेटचे सदस्य मार्को रुबीओ यांनी नुकतेच अमेरिकेत भारताचे राजदूत तरनजितसिंग संधू यांना भेटून भारतीय नागरिकांबद्दलच्या सहभावना व्यक्त केल्या.

## ‘गाय छाप’चे लेबल लावून बनावट तंबाखूची विक्री

अहमदनगर- संगमनेरच्या ‘गाय छाप’ कंपनीचे नकली लेबल तयार करून त्यात बनावट तंबाखू पॅकिंग करून विक्री करणाऱ्या टोळीचा नगर तालुका पोलिसांनी पर्दापाश केला असून, चिचोंडी पाटील शिवारात टाकलेल्या छाप्यात नगरमधील दोघाजणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासंदर्भात मिळालेली माहिती अशी की, चिचोंडी पाटील गावच्या शिवारात चिचोंडी ते पिंपळा रोडवर एका पोल्ट्री फार्मच्या शेडमध्ये आरोपी नदीम जहीर खान उर्फ शेख (रा. मुकुंदनगर) व जब्बार शमशुद्दीन शेख (रा. जुना मुकुंदनगर) हे त्यांच्या साथीदारांसह संगमनेरच्या गाय छाप तंबाखू कंपनीचे बनावट लेबल तयार करून ते बनावट असलेल्या तंबाखूच्या पुडीवर चिकटवून हलक्या प्रकारच्या तंबाखूतील गाय छापच्या नावाने विक्री करत होते. याबाबतची माहिती कंपनीला मिळाल्यानंतर कंपनीचे डेपो मॅनेजर संकल्प नंदकिशोर लाहोटी यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून नगर तालुका पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षर जारवाल यांनी पथकासह चिचोंडी पाटील शिवारात छापा टाकला असता तेथे ३ लाख ११ हजार ६०० रुपये किंमतीची बनावट तंबाखू आढळून आली. यातील जब्बार शेख या आरोपीला ताब्यात घेण्यात आले तर नदीम खान हा फरार झाला. याप्रकरणी संकल्प लाहोटी यांच्या फिर्यादीवरून या दोन्ही आरोपींविरुद्ध भादंवि कलम ४२०, ४६७, ४६८, ४६९, ४७२, ४७५ सह कॉपीराईट अॅक्ट कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अलहजशेख अब्दुल अज़ीज उर्दू कॉलेजच्या निकालाची उज्वल परंपरा कायम

अहमदनगर- आलमगीर येथील अलफलाह एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी संचलित अलहजशेख अब्दुल अजीज उर्दू ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्टस्, कॉर्स ॲण्ड सायन्स ज्युनिअर कॉलेजचा मार्च २०२० मध्ये झालेल्या इ. १२ वी परिक्षेचा निकाल ८० टक्के लागला. कॉलेजमध्ये प्रथम क्रमांक शेख खनसा अब्दुलरज्जाक,द्वितीय - शेख अयमन अबिद व फकीर अरबिया रफिक, तृतीय -शेख सॉलेहा अब्दुलकुद्दुस यांनी मिळविला.संस्थेचे प्रमुख कार्यवाह प्रा.डॉ. अब्दुस सलाम सर व पदाधिकाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थी व प्राचार्य शेख जमीरअहमद इस्माईल, प्रा.खान निशात अंजुम, शेख आफरीन, तांबोळी नसरीन यांचे अभिनंदन केले. अलहज अब्दुल अजिज कॉलेजमधील विद्यार्थी हे सर्वसामान्य घरातील असून, त्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल त्यांचे परिसरातूनही कौतुक होत आहे. या निकालाने कॉलेजने उज्वल परंपरा कायम राखली आहे.

साप्ताहिक दर्शक
e-mail - weeklydarshak@gmail.com

IF UNDELIVERED
PLEASE RETURN TO
DARSHAK
DARSHAK BHAVAN,
726,OPP.DEPALI
THEATER ZENDIGATE,
AHMEDNAGAR-414001
MAHARASHTRA

R.N.I. NO.
MAH/MAR/2000/02266
POSTAL REGD.NO.
ANR/068/2018-2020

TO,